# मराठी (कुमारभारती)

## उत्तरे : सराव कृतिपत्रिका 3 री

**प्र. 1. (अ)**

**(1)** (i) पोस्टमन मनानंच कोरं पत्र वाचतो; कारण त्या म्हातारीला पुत्रभेटीचा आनंद मिळावा आणि तिचे शेवटचे दिवस समाधानात जावेत, अशी पोस्टमनची इच्छा होती.

(ii) म्हातारीच्या तोंडावर समाधान पसरायचं; कारण दूर परगावी राहणारा आपला मुलगा आपली आठवण काढतो आणि आपल्याला तो त्याच्याकडे नेणार आहे, या कल्पनेने तिचे मन सुखावायचे.

**(2)**

पोस्टमनची गुणवैशिष्ट्ये
- → नुसता पत्रे पोहोचवणारा सरकारी नोकर नाही; भला माणूस आहे.
- → माणसामाणसांमध्ये भावनेची नाती निर्माण करणारे पूल आपल्या मुलाला दाखवतो.
- → म्हातारीचे वाट पाहणे सुखाचे करणारी रीत जाणतो.

*(**नोंद :** वरीलपैकी कोणतीही दोन लिहावीत.)*

**(3)** 'वाट पाहताना' या पाठात लेखिकेने जीवनाचा एक सुखमंत्रच सांगितला आहे. वाट पाहणे हा तो मंत्र होय. कोणत्याही गोष्टीसाठी वाट पाहायला शिकले पाहिजे, असे त्यांचे सांगणे आहे. वाट पाहणे हे तसे कधीच सुखाचे नसते.

एखादी गोष्ट वाट न पाहता, चटकन मिळाली, तर ती गोष्ट आपली जिवाभावाची आहे की वरवरची आहे, हे कळायला मार्ग राहत नाही. इच्छा तत्काळ पूर्ण झाल्यास आपल्याला आनंद मिळेल, हे खरे आहे. पण आपण कदाचित वरवरच्या गोष्टींमध्ये बुडून जाण्याची शक्यता असते. अधिकाधिक वाट पाहिल्यामुळे आपली खरी ओढ कुठे आहे, हे कळते. म्हणजेच आपल्याला खरोखर काय हवे आहे, नेमकी कशाची गरज आहे, हे कळून चुकते. जे आपल्या दृष्टीने मोलाचे आहे, ते शोधण्याची दृष्टी या वाट पाहण्यातून मिळते. आपल्या दृष्टीने मोलाच्या असलेल्या गोष्टी मिळाल्या तर आपले जीवन समृद्ध होते. समृद्ध जीवन जगणे हेच तर प्रत्येक माणसाचे ध्येय असते. म्हणून वाट पाहणे त्रासाचे असले, तरी अनेक गोष्टींचे मोल ओळखण्यासाठी ते उपयोगी ठरते, हे खरे आहे.

**प्र. 1. (आ)**

**(1)** (i) स्त्रीने स्वातंत्र्य कमवावे असे वाटणे, म्हणजे खडकावर डोके आपटण्यासारखे आहे.

(ii) समाजाविरुद्ध विद्रोह केला, तर विद्रोह करणाऱ्याला समाज गिळून टाकायला येईल.

**(2)** (i)

महर्षी कर्वे यांना अपेक्षित असलेले स्वातंत्र्य प्रकार
- → राष्ट्रीय स्वातंत्र्य
- → संपूर्ण स्वातंत्र्य

(ii)

महर्षी कर्वे यांची प्रेरणास्थाने
- → पंडिता रमाबाई यांचे जीवनचरित्र
- → ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे जीवनकार्य

**(3)** अण्णासाहेबांनी फार मोठे स्वप्न पाहिले होते. ते फार मोठी झेप घेऊ पाहत होते. त्यांच्या स्वप्नाला संपूर्ण समाजाची साथ मिळाली नाही. समाजाने अण्णासाहेबांना ओळखलेच नाही. समाजाने साथ दिली नाहीच; उलट पराकोटीचा विरोध केला. त्यांचा सतत अपमान केला. त्यांना धक्काबुक्की केली. त्यांचे कपडे फाडले. हे रोज घडत होते. त्यामुळे स्वत:चे कपडे रोज रोज शिवण्याची पाळी त्यांच्यावर येई. स्त्री-शिक्षणासाठी देणग्या गोळा केल्या, तर भ्रष्टाचाराचा सतत धाक दाखवला जाई. त्यांच्या चळवळीमुळे त्यांच्या कुटुंबीयांनाही त्रास सहन करावा लागे. त्यांच्यावर बहिष्कार टाकण्यातही आला होता. हे सर्व यातनामय होते. लोककल्याणासाठी अण्णासाहेबांनी या यातना सहन केल्या. आज आपण अण्णासाहेबांची स्मारके उभारतो; परंतु प्रत्यक्ष जीवनात त्यांना दु:ख, कष्ट व यातनाच सहन कराव्या लागल्या. 'जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण,' हे तुकाराम महाराजांचे वचन महर्षी कर्वे यांना तंतोतंत लागू पडते.

**प्र. 1. (इ)**

**(1)** **हास्यात गुंतलेले शरीराचे भाग**

- चेहरा
- स्नायू
- ऊर
- आतली इंद्रिये

**(2)**

| पत्करलेले वेड | पांघरलेले वेड |
|---|---|
| काहीही कारण नसताना ठरवून, पोट धरधरून, खळखळून, मोठमोठ्याने हसणे हे पत्करलेले वेड असते. | जीवन आंबलेली, अवघडलेली माणसे हसतात, ते पांघरलेले वेड असते. |

**प्र. 2. (अ)**

**(1)** **संत रामदास यांनी विचार करून करायला सांगितलेल्या गोष्टी**

- अपकीर्ती सांडावी, सत्कीर्ती वाढवावी.
- सत्याची वाट दृढ धरावी.

**(2)** **कधीही करू नयेत अशा गोष्टी**

- पुण्यमार्ग सोडू नये.
- पैज किंवा होड लावू नये.
- कुणावरही आपले ओझे लादू नये.
- असत्याचा अभिमान बाळगू नये.

**(3)** संत रामदास श्रोत्यांना म्हणतात—तुम्हांला मी उत्तम, गुणवान व्यक्तीची लक्षणे सांगतो, ती तुम्ही सावध चित्ताने ऐकावीत. ही वैशिष्ट्ये ऐकून तुम्ही सर्व गोष्टी जाणण्याची खूण अंगी बाणवावी.

**(4)** 'उत्तमलक्षण' या ओव्यांमध्ये संत रामदास यांनी उत्तम व्यक्तीची लक्षणे विशद करताना आळस हा माणसाचा शत्रू आहे, असे ठासून प्रतिपादिले आहे.

‘आळस’ हा माणसाच्या अंगी असलेला दुर्गुण आहे. आळसामुळे कार्य करायला उत्साह राहत नाही व त्यामुळे बरीच कामे खोळंबून राहतात. ‘आळसे कार्यभाग नासतो!’ या समर्थ रामदासांच्या उक्तीमध्ये हेच तत्त्व सांगितले आहे. माणसाच्या मनाला जे षड्विकार जडतात, त्यात ‘आळस’ हा एक विकार आहे. दैनंदिन कामांमध्ये आळसाला स्थान देऊ नये. आळसामुळे प्रगती खुंटते, भविष्य अंधारते. आळसामुळे मनाला जडत्व प्राप्त होते व माणूस नाकर्ता होतो. आळशी माणसाला समाजात मान मिळत नाही. म्हणून आळसात सुख मानू नये, समाधान मानू नये, असे समर्थ रामदास सांगतात.

**प्र. 2. (आ)**

(1)

| **आश्वासक चित्र** |
|---|
| (i) कवितेची कवयित्री — नीरजा |
| (ii) कवितेचा विषय — स्त्री-पुरुष समानता |
| (iii) कवितेतून व्यक्त होणारा विचार — अजूनही समाजाने पूर्णपणे स्त्री-पुरुष समानता अंगीकारलेली नाही. हे निराशाजनक आहे. परंतु भावी काळ हा स्त्री-पुरुष समानतेचाच असणार आहे. म्हणून सर्वांनी स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व आतापासूनच मान्य करून ते अंगीकारले पाहिजे, असा विचार या कवितेतून मांडला आहे. |

(2)

| **खोद आणखी थोडेसे** |
|---|
| (i) कवितेची कवयित्री — आसावरी काकडे |
| (ii) कवितेचा विषय — प्रयत्न व सकारात्मकता यांचे महत्त्व |
| (iii) कवितेतून व्यक्त होणारा विचार — जीवनात खूप कष्ट उपसावे लागतात, तरीही अनेकदा यश हुलकावणी देते. कधीही प्रयत्न केल्याबरोबर वा कष्ट घेतल्याबरोबर लागलीच यश मिळत नसते. माणसे त्यामुळे नाउमेद होतात. असे माणसाने कधीच नाउमेद होऊ नये. सतत प्रयत्न करीत राहावे. आपल्याला यश मिळेलच अशी आशा बाळगावी, असा विचार या कवितेतून व्यक्त केला आहे. |

**प्र. 2. (इ)**

**आशयसौंदर्य :** ‘केकावली’ या काव्यग्रंथाची समाप्ती करताना उपसंहार म्हणून ही ‘भरतवाक्य’ काव्यरचना कविश्रेष्ठ मोरोपंतांनी लिहिली आहे. तनामनातील दुर्गुण जाऊन सद्‌गुण कोणते व कसे अंगीकारावे, याबद्दल देवाकडे आर्त प्रार्थना केली आहे.

**काव्यसौंदर्य :** ‘सुसंगती’ म्हणजे चांगल्या, सज्जन व्यक्तीची मैत्री होय. गुणवान व चारित्र्यवान माणसांच्या संगतीत सदैव राहावे, म्हणजे आपली आत्मिक प्रगती व ज्ञानप्राप्ती होते, असा आशय उपरोक्त ओळींमध्ये व्यक्त झाला आहे. ‘सुजनवाक्य’ म्हणजे सुविचारांची धारणा जर केली, तर मन निर्मळ व प्रेमळ होते. असाही सुयोग्य सल्ला मोरोपंतांनी जनसामान्यांना दिला आहे.

**भाषिक वैशिष्ट्ये :** प्रस्तुत ओळींमध्ये सामान्य माणसांना परमार्थाची आवड लागावी, म्हणून दोन वर्तन-नियम सांगितले आहेत. साधकाने चारित्र्यसंपन्न होण्यासाठी उपदेश केला आहे. प्रत्येक चरणात ११ + १३ मात्रेची आवर्तने असणारे हे ‘केकावली’ नावाचे मात्रावृत्त आहे. यातील भाषा साधी, सोपी व आवाहक असल्यामुळे हृदयाला थेट भिडणारी आहे. ‘घडो—जडो’ या यमकप्रधान क्रियापदांमुळे कवितेला सुंदर लय व नाद आला आहे.

प्र. 3.

**(1)** काही मुले वेगवेगळ्या कारणांनी आईवडिलांशी भांडतात आणि रागाच्या भरात घर सोडून निघून जातात. मुंबईसारखे शहर व सिनेमा यांच्यातील झगमगत्या दुनियेला भुलून काही मुले घरातून पळ काढतात. गरिबीला कंटाळून चार पैसे मिळवण्यासाठी शहराकडे धाव घेणारी मुलेही असतात. कधी कधी काही समाजकंटक मुलांना पळवून नेतात आणि त्यांना अवैध कामांना जुंपतात. अशा अनेक कारणांनी मुले स्वतःच्या घराला मुकतात.

**(2)** स्वाती महाडिक यांनी पतिनिधनाचे असीम दुःख झेलले. त्या दुःखात बुडून जाऊन त्या निष्क्रिय झाल्या नाहीत. आपल्या पतीचे देशाची सेवा करण्याचे अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करण्याचा त्यांनी निर्धार केला. एवढेच नव्हे; तर तो निर्धार त्यांनी पुरा केला. या घटनेचा समाजावर प्रभाव पडलाच. समाजाला त्यातून एक महत्त्वाचा संदेश मिळाला.

आपल्या समाजात अजूनही पुरुषप्रधान संस्कृती आहे. पुरुषांनी सैन्यात भरती होण्याबाबत समाज अनुकूल असतो. हाच समाज स्त्रियांना सैन्यात पाठवण्यास मात्र तयार नसतो. स्त्रियांकडे शारीरिक – मानसिक बळ कमी असते, स्त्रिया सैनिकांचे काम करूच शकणार नाहीत, अशीच समाजाची धारणा असते.

या पार्श्वभूमीवर, स्त्रिया पुरुषांइतक्याच सक्षम असून सैनिकाचे कामही करू शकतात, असा संदेश समाजाला मिळतो.

**(3)** साहित्यकृतींतील भावरसाचे अभ्यासपूर्ण विश्लेषण म्हणजे साहित्यकृतींचा आस्वाद किंवा रसास्वाद होय. रसास्वाद परिपूर्ण होण्यासाठी पुढील बाबी लक्षात घ्यायला हव्यात :

कलाकृतीचा आशय किंवा कथानक, व्यक्तिरेखा मनाला पटणाऱ्या असल्या पाहिजेत. त्यांच्या स्वभावात वाचकांना किंवा प्रेक्षकांना भारावून टाकण्याची शक्ती असली पाहिजे. लेखकाची भाषाशैली, वर्णनशैली वाचनीय व प्रभावी असली पाहिजे. कथानक उत्कंठा वाढवणारे असले पाहिजे.

आपल्या समोरची कलाकृती ही कविता असेल तर त्या कवितेतून कवी कोणता भाव व्यक्त करू पाहतो, हे लक्षात घेतले पाहिजे. त्याला अनुसरून भाषा, अलंकार, प्रतिमा–प्रतीके इत्यादी आहेत का, हेसुद्धा पाहिले पाहिजे. कवितेतून उत्कट भावना व्यक्त झाल्या पाहिजेत.

कथा, कादंबरी वा नाटक असा कोणताही साहित्यप्रकार असो, साहित्यातून व्यापक मानवी मूल्ये प्रकट झाली पाहिजेत. उच्च, उदात्त असे संदेश साहित्यातून मिळायला हवेत. या सर्व गोष्टी आपल्या रसास्वादामध्ये असल्या पाहिजेत.

प्र. 4. (अ)

**(1)**

| विग्रह | सामासिक शब्द |
|---|---|
| (i) सात सागरांचा समूह | – सप्तसिंधू |
| (ii) दहा किंवा बारा | – दहाबारा |

**(2)**

| प्रत्ययघटित | उपसर्गघटित |
|---|---|
| (i) सामाजिक | (i) अभिनंदन |
| (ii) नम्रता | (ii) अपयश |

**(3)** (i) सार्थक होणे – **अर्थ :** धन्य वाटणे.

**वाक्य :** राजू पदवीधर झाल्यावर आईच्या कष्टांचे सार्थक झाले.

(ii) कपाळाला आठी पडणे – **अर्थ :** नाराजी व्यक्त करणे.

**वाक्य :** दिवाळीसाठी आणलेले नवीन कपडे पाहून नमिताच्या कपाळाला आठी पडली.

(iii) मुहूर्तमेढ रोवणे – **अर्थ :** पाया घालणे.

**वाक्य :** गाडगे महाराजांनी स्वच्छता मोहिमेची मुहूर्तमेढ रोवली.

(iv) खूणगाठ बांधणे – **अर्थ :** निश्चय करणे.

**वाक्य :** अजयने दररोज नियमित व्यायाम करण्याची मनाशी खूणगाठ बांधली.

**प्र. 4. (आ)**

**(1)** (1) (i) लिहिता-वाचता न येणारा – निरक्षर

(ii) केलेले उपकार जाणणारा – कृतज्ञ

(2) (i) वाट = रस्ता (ii) डोळा = नयन

(3) (i) जमा × खर्च (ii) सोय × गैरसोय

(4) (i) स्त्री – स्त्रिया (ii) पोथी – पोथ्या

**(2)** (i) समीक्षा (ii) निर्मिती

(iii) स्तिमित (iv) पारंपरिक

(v) विभूषित (vi) पुनर्विवाह

**(3)** तिला म्हटले, ''कर्व्यांच्या पुतळ्यापाशी बसून रडायला तुला काहीच कसे वाटत नाही?''

**(4)** (i) Bookstall – पुस्तक विक्री केंद्र (ii) Highway – महामार्ग

**प्र. 5. (अ), (आ) व (इ)...**

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तर लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी यांची उत्तरे स्वत: लिहावीत.

या विषयातील सोडवून दिलेल्या पहिल्या कृतिपत्रिकेतील उपयोजित लेखनामधील कृतींची उत्तरे विद्यार्थ्यांनी अभ्यासावीत; गुणदानपद्धतीतील मुद्दे विचारात घ्यावेत आणि स्वत: लिहिलेले उत्तर स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

उपयोजित लेखनाच्या अधिक अभ्यासासाठी **'नवनीत मराठी प्रथम भाषा उपयोजित लेखन : इयत्ता दहावी'** या पुस्तकात दिलेले उपयोजित लेखनाचे नमुने अवश्य वाचावेत.